# जागेच्या उपलब्धतेनुसार औषधी वनस्पतींची लागवड



## मनोगत

लहानपणी पडसे-खोकला-ताप आला असता आजीने आपल्याला तुळशीचा काढा प्यायला दिल्यावर तासाभराने घाम येऊन आपल्याला बरे वाटलेले आठवत असेल. 'ॲलोपॅथी'ने आपल्याला दिवसातून तीन वेळा 'एक पांढरी गोळी-एक पिवळी गोळी' घ्यायला शिकवले आणि आपण आयुर्वेदाला विसरलो. आता मात्र आपल्याला आयुर्वेदाकडे वळावेच लागणार आहे. याचे एक कारण म्हणजे 'ॲलोपॅथी'चे दुष्परिणाम आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे दुसरे कारण म्हणजे भीषण आपत्काळ. या काळात डॉक्टर, वैद्य, पेठेतील (बाजारातील) औषधे इत्यादी उपलब्ध होणार नाहीत. आपत्काळात स्वतःसह कुटुंबियांच्याही आरोग्याचे रक्षण करणे, हे मोठे आव्हानच असते. अशा वेळी आपण लागवड केलेल्या औषधी वनस्पतीच उपयोगी पडतील; म्हणून आतापासूनच आपण त्यांच्या लागवडीकडे लक्ष द्यायला हवे. यासाठीच या ग्रंथाचे प्रयोजन आहे.

प्रस्तुत ग्रंथात २०० हून अधिक औषधी वनस्पतींचा समावेश केला आहे. सदनिकेच्या ('फ्लॅट'च्या) सज्जात (गॅलरीत) लावण्याजोग्या, परसात लावण्याजोग्या, पडीक भूमीमध्ये अत्यल्प श्रम करून लावता येण्याजोग्या आणि चालू शेतीत आंतरपीक म्हणून लावता येण्याजोग्या औषधी वनस्पती, अशी त्यांची वर्गवारी केली आहे.

ज्यांना काही अडचणींमुळे अशी लागवड करणे शक्य नसेल, त्यांना लागवड करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या व्यक्ती, शेतकरी वा समाजसेवी संस्था यांना स्वतःकडे असलेली भूमी, धन आदी अर्पण करता येईल. या माध्यमातून त्यांचे समाजकार्य आणि एकप्रकारे साधनाच होईल.

'आपत्काळाच्या दृष्टीने आणि एरव्हीही आरोग्याचे रक्षण होण्यासाठी औषधी वनस्पतींची लागवड सर्वांकडून आतापासूनच केली जावो', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**

## अनुक्रमणिका

१. औषधी वनस्पतींच्या लागवडीची आवश्यकता ११

२. औषधी वनस्पतींच्या लागवडीचे आनुषंगिक लाभ १२

३. प्रस्तुत ग्रंथ वाचतांना लक्षात घेण्याची सूत्रे १३

४. प्रत्येकालाच अगदी घराच्या सज्जातही लावता येतील, अशा निवडक औषधी वनस्पती आणि त्यांचे सविस्तर उपयोग १३

५. परसात किंवा बागायतीमध्ये लावता येण्याजोग्या औषधी वनस्पती ४०

६. चालू शेतीत लावता येण्याजोग्या औषधी वनस्पती ५५

७. पडीक भूमीत व पाणी अल्प असतांना लावता येण्याजोग्या वनस्पती ५६

८. लागवडीची आवश्यकता नसलेल्या; परंतु भोवतालच्या परिसरातून हेरून ठेवण्याजोग्या औषधी वनस्पती ६६

९. नवग्रह, २७ नक्षत्रे, १२ राशी, सप्तर्षी आदींशी संबंधित वनस्पती ७१

१०. घराभोवती लावता येण्याजोग्या सात्त्विक वनस्पती ७४

११. औषधी वनस्पतींचे बियाणे, रोपे इत्यादी कोठे मिळतात ? ७५

卐 परिशिष्ट १ : वनस्पतींची मराठी, संस्कृत आणि लॅटिन नावे ७८

卐 परिशिष्ट २ : दैनंदिन जीवनात आढळणारे शंभरहून अधिक विकार आणि त्यांवर उपयुक्त निवडक वनस्पतींची सूची ८६

**वृक्षारोपण राजकारण्यांच्या हस्ते नको, तर संतांच्याच हस्ते करा !**

‘जसे बी, तसे फळ’ येते; म्हणूनच राजकारण्यांच्या हस्ते वृक्षारोपण केलेल्या वृक्षांना रज–तमात्मक अहंकाराची, तर संतांच्या हस्ते वृक्षारोपण केलेल्या वृक्षांना साधकत्व निर्माण करणारी बिजे येतात !’

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले** (२०.८.२००८) F (DK-IRa + DW-IRa + L-Pla + Ch-L-Pla + DrKWBh + PR 42)